


# पारनेर दर्शन





वर्ष १ अंक १२६, गुरुवार २५ जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## भरधाव एसटीची दोन कार, ट्रॅक्टरला धडक : ६ ठार

### नगर-कल्याण महामार्गावर भनगडेवाडी शिवारात अपघात







भाळवणी : संजय मोरे

**भरधाव वेगाने आलेल्या एस टी बसने रस्त्यावर उभ्या असलेल्या स्विफ्ट व इको कार तसेच ट्रॅक्टरला धडक दिल्याने सहा जण ठार तर चौघे जखमी झाले. बुधवारी पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास नगर-कल्याण महामार्गावर भनगडेवाडी शिवारात हा अपघात झाला.**

माळकुप शिवारातील कृषीनाथ ग्रीन एनर्जी लिमिटेड या साखर कारखान्याची ऊस वाहतूक करणारा ट्रॅक्टर (क्र.एम.एच.१७ सी.आर. ७८८४) हा रस्त्यावर पलटी झाल्याने रात्री सव्वा वाजण्याच्या रस्त्यावरील ऊस पुन्हा ट्रॅक्टरमध्ये भरण्याचे काम करण्यात येत होते. त्याच वेळी नगरकडे जाणारी इको कार ( क्र.एम. एच.२३ बी.एच.५२५५) व एक अनोळखी स्विफ्ट कार ट्रॅक्टरमागे येऊन थांबली. कारखान्याचे मुकादम अशोक चिमा केदार रा. जांबुत खुर्द ता. संगमनेर, प्रकाश रावसाहेब थोरात वारणवाडी ता. पारनेर, नीलेश रावसाहेब भोर देसवडे ता. पारनेर, कमलेश जालिंदर काशिद वारणवाडी ता. पारनेर, देवेंद्र गणपत वाडेकर रा. देवसडे हे ट्रॅक्टर व ट्रॉल्यासरळ करण्याचे काम करीत होते. त्याच वेळी ( क्र.एम.एच.२३ बी.एच ५२५५) ही इको कार तिथे येऊन थांबली. त्यापाठोपाठ पांढ्या रंगाची स्विफ्ट कारही येऊन थांबली. इको कारचा चालक तसेच अंबादास अडसूळ रा. भनगडेवाडी हे देखील ट्रॅक्टर सरळ करण्यासाठी मदत करीत होते.

पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास कल्याणच्या दिशेने ठाणे नगर ही ठाणे आगाराची बस ( क्र. एम.एच.२० जी.सी.४८२५) भरधाव वेगाने आली व स्विफ्ट कार, इको कार तसेच ट्रॅक्टरला जोराची धडक दिली. त्यात नीलेश रावसाहेब भोर रा. देसवडे ता. पारनेर, जयवंत रामभाऊ पारधी रा. जांबुत खुर्द ता. संगमनेर, संतोष लक्ष्मण पारधी रा. जांबुत खुर्द ता. संगमनेर अशोक चिमा केदार रा. जांबुत खुर्द ता. संगमनेर, प्रकाश रावसाहेब थोरात रा. वारणवाडी ता. पारनेर व सचिन कांतीलाल मंडलेचा रा. टाकळीमानूर ता. पाथर्डी हे ठार झाले तर बद्रीनाथ विठ्ठल जगताप रा. लोणी ता. शिरूर जि. बीड, कमलेश जालिंदर काशिद रा. वारणवाडी ता. पारनेर सुयोग अंबादास अडसूळ रा. भनगडेवाडी ता. पारनेर व देवेंद्र गणपत वाडेकर हे गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर पोलीस नियंत्रण कक्ष तसेच रूग्णवाहिकेशी संपर्क करण्यात आला. पारनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद वाघ पोलीसांच्या फौजफाटासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना भाळवणी व नगर येथे उपचारासाठी हालविले तर मृतदेह पारनेर ग्रामीण रूग्णालयात पाठविण्यात आले.देवेंद्र गणपत वाडेकर यांच्या फिर्यादीवरून बसचा चालक संजय गोविंद नागरगोजे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## पारनेर तालुक्यातील पतसंस्था सक्षम

### ■ अफवांवर विश्वास ठेवू नका ■ सहाय्यक निबंधक गणेश औटी



पारनेर : संतोष तांबे

**पारनेर तालुक्यातील सहकारी पतसंस्था सक्षम आहेत.ठेवीदारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन सहकार विभागाचे सहाय्यक निबंधक गणेश औटी यांनी केले.**

मंगळवारी पारनेर येथे मा. गुलाबराव शेळके सभागृहात नागरी/ ग्रामीण सहकारी पतसंस्थांचे आदर्श उपविधीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे १६ जानेवारी २०२४ चे पत्रान्वये पतसंस्थामार्फत अभिप्राय मागवण्यात आलेले आहे. या चर्चासत्रामध्ये पारनेर सहाय्यक निबंधक गणेश औटी बोलत होते.

राज्य फेडरेशनचे अध्यक्ष तथा आदर्श उपविधी दुरुस्ती समिती सदस्य काका कोयटे, राज्य फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, सभापती काशिनाथ दाते सर, निघोज ग्रामीण पतसंस्था चेअरमन वसंत कवाद, सेनापती बापट पतसंस्था चेअरमन रामदास भोसले, पारनेर फेडरेशन अध्यक्ष शिवाजी मोरे, वसंतराव चेडे, तालुका विकास अधिकारी प्रभाकर लाळगे तर ऑनलाईन प्रणालीद्वारे जिल्हा बँक संचालिका गीतांजलीताई शेळके, जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड उपस्थितीत होते.

यावेळी बोलताना औटी की,म्हणाले पारनेर तालुक्यातील पतसंस्था अतिशय सक्षम आहेत. अफवांवर विश्वास ठेवू नका, एकाच वेळी सर्व ठेवीदारांनी पैशाची मागणी केल्यास कोणतीही संस्था किंवा राष्ट्रीयकृत बँक देखील ठेवी परत करू शकत नाही. एवढी जाणीव सर्व ठेवीदारांनी ठेवावी आणि पतसंस्थांना सहकार्य करावे. एखादा दुसरा अपवाद असू शकतो.पारनेर तालुक्यातील स्थानिक राजकारण किंवा आपापसातील मतभेद असल्याकारणाने म्हणा विनाकारण द्वेष पसरून, अफवा पसरून, संस्थेची बदनामी करण्याचा प्रयत्न होत आहे. या अफवांमुळे पतसंस्थांचे नुकसान होऊ नये, यासाठी संस्था चालकांनी एकमेकांशी चर्चा करून एकमेकांना आधार देण्यासाठी आजचा हा पतसंस्था आदर्श उपविधी मध्ये दुरुस्ती करणे संदर्भात चर्चासत्र आयोजित केले असल्याचे माहिती निबंधक औटी यांनी दिली.

यामध्ये मॅनेजर यांची शैक्षणिक पात्रता कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा, सहकार क्षेत्रातील कमीत कमी दोन वर्षाचा मॅनेजर पदाचा अनुभव असावा, संस्था कर्मचारी यांना द्यावयाचे कर्ज तारणी असावी, स्वनिधीच्या २० टक्के असावे, ज्या संस्थांच्या कर्मचारी वर्गात निबंधकाने मंजूर केलेल्या सेवा नियमानुसार कर्ज व्याजदर ठेवावा, संस्थेचे उर्वरीत पान ३ वर

### यावेळी करण्यात आलेले ठराव

वैधानिक गुंतवणूक रोख तरळता प्रमाण (सीआरआर)
प्रणालीतून कर्ज वाटप करणे
कर्मचारी सेवा नियम लागू करणे
राज्य / तालुका फेडरेशनचे सभासदत्व
स्थैर्य निधी देणे
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता हांडे यांनी केले यावेळी पारनेर तालुक्यातील विविध पतसंस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, संचालक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

पारनेर तालुक्यातील ८६ पतसंस्थांचा वैधानिक तरलता निधी (एसएलआर) च्या माध्यमातून १,४२५ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. पारनेर तालुक्यातील पतसंस्थांची गुंतवणूक तबल ५५३ कोटी रुपयांची आहे. म्हणजे शासननाच्या नियमानुसार संस्थांचा एसएलआर २५% राखण्याची मर्यादा असते, परंतु पारनेर तालुक्यातील तरलता ३८.८०% आहे. याचा अर्थ पारनेर तालुक्यातील पतसंस्था किती सक्षम आहे हे दिसते याला आपण प्रसिद्धी दिली पाहिजे. परिस्थिती खूप सक्षम आहे अफवा पसरू नका, जिल्ह्यातील एकूण पतसंस्थांच्या ठेवीपैकी १४.०२ टक्के ठेवी एकट्या पारनेर तालुक्यातील आहे. त्यामुळे पारनेर तालुक्यातील ठेवीदारांनी घाबरण्याचे कारण नाही. एकही संस्था अडचणीत येणार नाही याची जबाबदारी राज्य फेडरेशन घेत असल्याची ग्वाही देतो.

**काका कोयटे**
अध्यक्ष , राज्य फेडरेशन सहकारी संस्था.

ऑनलाईन वरुन जी.एस.महानगर व जिल्हा बँकेत पारनेरच्या पतसंस्थेच्या बऱ्याच ठेवी आहेत. पारनेरच्या पतसंस्था अतिशय सक्षम आहेत. पतसंस्था या ग्रामीण लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी फार मदतगार आहेत. ठेवीदारांनी कष्टाचे पैसे आपल्यावर विश्वास ठेवून आपल्या बँकेत अथवा पतसंस्थेत ठेवलेले असतात त्याची जबाबदारी आपण सर्वांनी पाळली पाहिजे.

**गीतांजली शेळके**
संचालक, जिल्हा बँक

ऑनलाईन वरुन पारनेर तालुका सहकाराचा उगम आहे. राज्यात आपली एक ओळख आहे. सहकार चळवळ टिकणे अत्यंत गरजेचे आहे. जिल्हा बँकेचा प्रतिनिधी म्हणून एक ग्वाही देतो आपली जिल्हा बँकेची डायरेक्टर बॉडीची मिटिंग करून ज्या संस्थांचे बॅलन्स शीट चांगले आहे त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करणार. यावेळी दाते सरांनी गायकवाड यांना सुचवले की बँकेच्या पुढील मिटिंगमध्ये ज्या संस्था अडचणीत आहेत त्यांना मदत करण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यास संचालक गायकवाड यांनी प्रतिसाद दिला.

**प्रशांत गायकवाड**
संचालक, जिल्हा बँक

## जिल्ह्यातील दोन्ही जागांवर शिवसेना दावा करणार?

### ■ शिर्डीसोबतच नगरमध्येही लावली ताकद ■ खा.राऊतांच्या उपस्थितीत रविवारी मेळावा



नगर :प्रतिनिधी

**नगर जिल्ह्यात लोकसभेच्या अहमदनगर आणि शिर्डी अशा दोन जागा आहेत.भाजप-शिवसेना युती असताना यातील शिर्डीची जागा शिवसेनेकडे होती. त्यावर पक्षाला सलग विजय मिळाला आहे. आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट महाविकास आघाडीत असताना मात्र जिल्ह्यातील दोन्ही जागांवर दावा केला जाऊ लागला आहे.**

शिर्डीसोबतच नगरमध्येही पक्षाने ताकद लावण्यास सुरुवात केली आहे. पक्षाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत रविवारी (२८ जानेवारी) नगरला मेळाला घेणार आहेत. याच्या नियोजनासाठी आलेले पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार सुनील शिंदे यांनी हा दावा केला आहे. शिर्डीची जागा आमच्याच वाट्याला असून नगरमध्ये तीन वजनदार नेते आमच्याकडे येण्यास उत्सुक आहेत, त्यामुळे या जागेवरही आम्ही दावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नगरची जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाकडे आहे. तरीही शिवसेनेकडून त्यावर दावा केला जात असल्याने महाविकास आघाडीची डोकेदुखी वाढणार आहे.

शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांच्या उपस्थितीत ठाकरे गट शिवसेनेचा मेळावा २८ जानेवारीला होणार आहे. त्याच्या नियोजनासाठी शहरातील पदाधिकार्यांची बैठक आमदार शिंदे यांनी शासकीय विश्रामगृहावर घेतली. यावेळी शहर प्रमुख संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसौंदर, युवा सेना उर्वरीत पान ३ वर

## सहकार मंत्र्यांकडून पारनेरच्या अवसायकाला बेकायदा मुदतवाढ

### खंडपीठाच्या आदेशाला केराची टोपली



पारनेर : प्रतिनिधी

**देवीभोयरे येथील पारनेर तालुका सहकारी साखर कारखन्याच्या अवसायकाला सहकार मंत्री दिलीप वळसे यांनी सन २०१५ ते २०२५ अशी बेकायदा मुदतवाढ दिल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला आहे.**

अवसायनाचा दहा वर्षांचा ठराविक कालावधी पुर्ण झाल्यानंतर सहकार कायद्यातील अवसायक नियुक्तीच्या नियमांचे उल्लंघन करून जुन २०१६ मध्ये पारनेर कारखान्याचे अवसायक म्हणून नियुक्त करण्यात आलेले राजेंद्र निकम यांना कारखान्याचे कामकाज थांबविण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिले होते. अवसायकाने गेली आठ वर्षे केलेल्या बेकायदा कामकाजाबद्दल चार आठवडयांत सरकारकडून स्पष्टीकरणही मागविण्यात आले होते. मात्र न्यायालयात स्पष्टीकरण सादर न करता राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे यांनी अवसायकाच्या कामाला दहा वर्षांची विशेष बाब म्हणून मुदत वाढ दिली आहे.

मुदतवाढ देताना आठ वर्षे अवसायकाने केलेल्या सर्व बेकायदा कामांना कायदेशीर ठरविणारा मजकुरही उर्वरीत पान ३ वर

## सगेसोयरे शब्द आमचा नव्हे त्यांचा !

### ■ मनोज जरांगेंनी दाखवले चर्चेला आलेल्या न्यायाधीशांकडे बोट ■ आझाद मैदानावरील उपोषणावर ठाम



पुणे : प्रतिनिधी

**सगेसोयरे या शब्दावरून मराठा आरक्षणाचा पेच फसला आहे. हा शब्द मनोज जरांगे यांनी पुढे सरकवल्याचा दावा केला जातो. पण आता स्वतः जरांगेंनी हा शब्द आम्ही नव्हे तर आमच्याशी चर्चा करण्यासाठी आलेल्या त्या २ न्यायाधीशांनी दिल्याचा दावा केला आहे. त्यांच्या या विधानामुळे या प्रकरणी नव्याने चर्चा सुरू झाली आहे.**

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला सरसकट कुणबी आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी ते गत २० तारखेला जालन्याच्या आंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने निघालेत. ते मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत उपोषण करणार आहेत. पत्रकारांनी बुधवारी त्यांना सगेसोयरे शब्दावर निर्माण झालेल्या कायदेशीर पेचप्रसंगाविषयी प्रश्न केला. त्यावर त्यांनी हा शब्द आमचा नव्हे तर आमच्याशी चर्चा करण्यासाठी आलेल्या त्या २ न्यायाधीशांचा असल्याचे स्पष्ट केले.

आम्ही सरकारकडे कोणतीही नवी मागणी केली नाही. आम्ही अशी एखादी नवी मागणी केल्याचे एखाद्याने पुढे येऊन सांगावे. आमचा कोणताही हेका-फेका नाही. आमचा सगेसोयरे शब्द त्या न्यायाधीशांनी घेतला आहे. त्यांना कायद्याचा अभ्यास आहे. न्याय मंदिरात ते सर्वांना न्याय देतात. सगेसोयरे हा शब्द आमचा नाही. आमच्याशी चर्चा करण्यासाठी आलेल्या न्यायाधीशांचा आहे, असे मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी पत्रकारांशी संवाद साधताना स्पष्ट केले.


**सगेसोयरे म्हणजे काय?**

मनोज जरांगे यांनी यावेळी मराठा समाजाच्या नजरेतून सगेसोयरे शब्दाची व्याख्याच सांगितली. मराठा समाजात पिढ्यांपिढ्या परंपरेनुसार गणगोतात, लग्नाच्या सोयरीकी जुळतात त्या सर्वच सोयऱ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्यात यावे. मराठा समाजात गणगोतात जिथे जिथे लग्नाच्या सोयरीकी जुळतात, त्या सर्वच सोयऱ्यांना नोंद सापडलेल्या मराठा बांधवांच्या नोंदीच्या आधारावर कुणबी प्रमाणपत्र दिले जावे, असे जरांगे म्हणाले. सरकारने आमची ही व्याख्या घेतली नाही. त्यांनी त्यात केवळ पितृतसत्ताक शब्द टाकला. आमचा आग्रह त्यात मातृसत्ताकही टाकण्याचा आहे. सरकार आमची मागणी नाही ते टाकण्याचा प्रयत्न करते, असेही मनोज जरांगे पाटील यावेळी म्हणाले.

## पुणेकरांना पुन्हा भरली हुडहुडी !

### ■ किमान तापमानात लक्षणीय घट ■ पारा ९.८ अंशावर

पुणे:प्रतिनिधी



**पुण्यात आठवडाभर मुक्काम ठोकलेल्या थंडीने बुधवारी पुणेकरांना हुडहुडी भरवली. सकाळी साडे आठपर्यंत शहरात किमान तापमानात लक्षणीय घट होऊन, शिवाजीनगर हवामान स्टेशनवर ९.७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पाषाण ८.२, हवेली परिसरात ८.७ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. पुण्यात या हंगामातील नीचांकी तापमानाची नोंदवले गेले असल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभागाने स्पष्ट केले.**

शहरात गेल्या दोन दिवसांपासून संध्याकाळनंतर हवेत गारवा आणि मध्यरात्री कडाक्याची थंडी जाणवते आहे. किमान तापमान १२ ते १४ अंश सेल्सिमध्ये रेंगाळल्याने रात्री थंडी आणि सकाळी आठवाजेपर्यंत हवेत गारठा कायम आहे. दरम्यान, बुधवारी रात्रीपासूनच हवेतील गारठा वाढला होता. बोचऱ्या वाऱ्यांमुळे मध्यरात्री थंडी वाढली. सकाळी लवकर फिरायला, व्यायामाला गेलेल्या नागरिकांना नेहमीपेक्षा जास्त थंडी असल्याने हुडहुडी भरली. शाळेत निघालेली मुले स्वेटर, मफलर अशी जय्यत तयारी उर्वरीत पान ३ वर



# टेकझोन

## ४१ कोटी फेसबुक युजर्सचे मोबाइल नंबर लीक

सोशल मीडिया साइट फेसबुक पुन्हा एकदा डेटा लीकमुळे चर्चेत आले आहे. यंदा तब्बल ४१९ मिलियन यूजर्सचे फोन नंबर लीक झाले आहेत. यात १३३ अमेरिकन युजर्स, १८ मिलियन ब्रिटिश युजर्स आणि ५० मिलियन व्हिएतनाम युजर्सचा डेटा आहे. पासवर्डने सर्व्हर सुरक्षित नसल्याने ही माहिती लीक झाली आहे. सिक्युरिटी रिसर्चर संयम जैन यांनी सांगितले, की ४१९ मिलियन फेसबुक युजर्सचा मोबाईल नंबर सार्वजनिक आहे. संयम जैनने फेसबुकच्या ऑनलाइन डेटाबेसचा शोध लावला आहे, ज्यात ४१९ मिलियन यूजर्सचे फोन नंबर लीक झाले आहेत. युजर आयडीपासून ते फोन नंबर आणि युजर्सचे खरे नाव, जेंडर आणि देशाची माहिती देखील लिक झाली आहे. सर्व्हरला पासवर्ड नव्हता. मात्र या रिपोर्टनंतर सर्व्हर ऑफलाइन करण्यात आला आहे. फेसबुकने या रिपोर्टवर म्हटले आहे की, हा डेटा जुना असून, तो याआधीच काढण्यात आला आहे. मागील वर्षीच कंपनीने यात बदल केले असून, त्यावेळी कंपनीने ते फिचर काढून टाकले आहे. या फिचरमुळे फोन नंबरद्वारे युजर्स कोणालाही शोधू शकत होते.



## क्रोम वापरताय?

**सर्वांत वेगवान आणि हाताळायला सोपे असणारे क्रोम ब्राऊझर आजघडीला जगभरात करोडो लोक वापरतात. गुगलने २००८ मध्ये हे ब्राऊझर उपलब्ध दिले होते आणि अल्पावधीत ते लोकप्रिय होऊन सफारी, फायरफॉक्स, मायक्रोसॉफ्ट एजला त्याने झोपवले. ब्राऊझर लोकांनी जास्तीत जास्त वापरावे यासाठी ते सुरुवातीपासूनच साधे आणि कमीत कमी इंटरनेट खर्च होईल असे विकसित करण्यात आले होते; पण यात कालांतराने अद्ययावत सुविधा देण्यात आल्या. ज्यामुळे तुम्ही तुमचे इंटरनेट ब्राऊझिंग अधिक चांगले व सुरक्षित करू शकता. या सुविधा कोणत्या हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल...**



### पाहुण्याची व्यवस्था करा...

आपला लॅपटॉप कुणी मागितला, तर त्यात आपण साठवलेली महत्त्वाची माहिती पाहू नये यासाठी ज्याप्रमाणे आपण वापरकर्त्यांमध्ये पाहुणा (गेस्ट) हा पर्याय ठेवतो. त्याचप्रमाणे आपल्या ब्राऊझिंगच्या गोष्टी लोकांनी पाहू नये यासाठी गुगल क्रोममध्ये आपण ब्राऊझिंगसाठीही पाहुणा (गेस्ट) वापरकर्त्यांचा पर्याय ठेऊ शकतो. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन पीपल हा पर्याय निवडावा लागेल तेथे एनेबल गेस्ट ब्राऊझिंग हा पर्याय निवडावा लागेल. हा पर्याय निवडल्यानंतर तुम्ही क्रोम लॉगइन केल्यावर उजव्या बाजूला येणाऱ्या तुमच्या वापरकर्ता नावावर क्लिक करून तुम्ही स्विच पर्सन हा पर्याय वापरून ब्राऊझर पाहुण्या वापरकर्त्यांसाठी खुला करून देऊ शकता.

### सर्व बुकमार्क दिसण्यासाठी...

क्रोमचा बुकमार्क बार हा खूपच लवकर भरतो, पण त्यानंतरही आपल्याला अनेक संकेतस्थळे बुकमार्क करून ठेवायची गरज असते; पण ते केल्यानंतरही ते संकेतस्थळ त्या बुकमार्क बारवर दिसत नाहीत. जर तुम्हाला ते संकेतस्थळ दिसावे असे वाटत असेल तर तुम्ही क्रोममध्ये बुकमार्क मॅनेजरमध्ये जा. तेथे सर्व बुकमार्कचे टायटल फिल्ड डिलीट करा. हे करत असताना लिंक डिलीट होणार नाही याची काळजी घ्या. यानंतर तुम्हाला त्या संकेतस्थळाचा छोटा लोगो दिसू लागेल.

### ओमनी बॉक्स करा सक्षम



तुमच्या ब्राऊझरचा ओमनी बॉक्स अर्थात आपण जेथे संकेतस्थळाचा पत्ता देतो ते ठिकाण अधिक सक्षम करता येणे शक्य आहे. म्हणजे यात आपण एखादे गणित सोडविण्यापासून ते एकक रूपांतरही करू शकतो. यासाठी गुगल सर्चमध्ये जाऊन एखादे संकेतस्थळ शोधून रूपांतर करण्याची गरज भासणार नाही. म्हणजे आपण त्या चौकटीत ५ फूट ते इंचेस असे टाइप केल्यावर आपल्याला उत्तर मिळू शकणार आहे. अनेकदा आपल्याला उत्तर आपण एन्टर बटण दाबण्यापूर्वीच मिळू शकणार आहे. या माध्यमातून आपण तापमान, अंतर आणि वजन अशा गोष्टींची माहिती मिळवू शकतो.

### संकेतस्थळ भेटीबद्दल...

तुम्ही एखाद्या संकेतस्थळाचा पत्ता टाकल्यावर ते सुरू होते. त्यानंतर तुम्हाला डाव्या बाजूला एक चिन्ह दिसते. त्या चिन्हावर तुम्ही क्लिक केल्यावर तुम्हाला तुम्ही जे संकेतस्थळ पाहात आहात, त्यात किती माहिती आहे, त्याची सुरक्षा यंत्रणा किती सक्षम आहे, हे संकेतस्थळ कुणी तयार केले आहे याचबरोबर संकेतस्थळांत किती कूकीज आहेत याचा तपशील मिळू शकणार आहे. ही माहिती आपण एखाद्या अनोळखी संकेतस्थळाला भेट देत असताना उपयोगी ठरू शकते.

### टास्क मॅनेजर

**तुम्ही वेगवेगळ्या टॅबमध्ये विविध संकेतस्थळे सुरू करता. अनेकदा एका टॅबवरील संकेतस्थळावर ट्रबल शूटिंगसारखी अडचण येते. त्या वेळेस तुम्हाला अनेकदा ब्राऊझर बंद केल्याशिवाय पर्याय राहत नाही. अशा वेळी तुम्ही क्रोमच्या टास्क मॅनेजरमध्ये जाऊन ते संकेतस्थळ निवडून त्याची प्रक्रिया थांबवू शकता. यामुळे तुम्हाला मुख्य टास्क मॅनेजर सुरू करून संपूर्ण क्रोम बंद करण्याची गरज पडणार नाही.**

### खूप मागे जाण्यासाठी...

आपण इंटरनेटचा वापर करत असताना एकामागून एक संकेतस्थळे सुरू करत असतो. साधारणत: एखाद तास इंटरनेटचा वापर केल्यानंतर आपण सर्वप्रथम जे संकेतस्थळ पाहिले होते त्या संकेतस्थळाला भेट द्यावी असे आपल्याला वाटते. अनेकदा आपण वेगवेगळ्या संकेतस्थळांवरून लिंक सुरू केलेल्या असतात. यामुळे आपल्याला त्या संकेतस्थळांचा पत्ता माहिती नसतो. अशा वेळी ते शोधून काढण्यासाठी बॅकचा पर्याय वापरला जातो. मात्र आपण किती वेळ हा पर्याय वापरणार. हे टाळण्यासाठी बॅक या पर्यायावर बराच वेळ क्लिक करून ठेवा. तेथे तुम्हाला तुम्ही भेट दिलेल्या संकेतस्थळांच्या लिंक्स दिसतील. त्यातील तुम्हाला पाहिजे ती लिंक तुम्ही निवडू शकता.

### शब्दार्थ जाणण्यासाठी...



आपण संकेतस्थळावर लेख किंवा पुस्तकातील काही तपशील वाचत असतो. हे वाचत असताना एखादा शब्द जर आपल्याला अडला, तर त्याचा अर्थ पाहण्यासाठी तो कॉपी करून डिक्शनरीसारख्या संकेतस्थळावर जाऊन त्याचा अर्थ शोधतो; पण गुगल क्रोममध्ये तुम्ही गुगल डिक्शनरी या टूलचा वापर करून तुम्ही तुम्हाला अडलेल्या शब्दावर दोन क्लिक केल्यावर त्यावर एका चौकटीत तुम्हाला त्याचा अर्थ समजू शकणार आहे. यासाठी तुम्हाला गुगलचा हा टूल सक्रिय करून घ्यावा लागणार आहे.

### सगळे सिंक करण्याची गरज नाही...

क्रोम वापरत असताना अनेकदा आपले पासवर्ड आणि ब्राऊझिंग हिस्ट्रीही त्या उपकरणात साठवून ठेवली जाते; पण हे सर्व सिंक करण्याची अर्थात साठवण्याची तशी गरज नसते. यामुळे तुम्ही सेटिंगच्या पानावर जा. तेथे ॲडव्हान्स्ड सिंक सेटिंग्ज हा पर्याय निवडा. त्यानंतर तुम्हाला काय सिंक करून हवे आहे तेवढेच पर्याय निवडा. उर्वरित पर्याय काढून टाका, जेणेकरून तुमची माहिती सिंक होणार नाही व ती त्या उपकरणात साठवूनही ठेवली जाणार नाही.

## हे होतं कसं?

एखादी गोष्ट कशी कार्य करते हे जाणून घेण्याची उत्सुकता सर्वांनाच असते. मग त्या दृष्टीने आपोआपच आपला शोध सुरू होतो. म्हणजेच माहितीशी संबंधित पुस्तकांचे वाचन, जाणकार व्यक्तींशी चर्चा इत्यादी. सर्वात सोपा मार्ग म्हणजे गुगल सर्च. गुगलवर सर्च केल्यावर आपल्याला लाखोंच्या संख्येने रिझल्ट्स मिळतात; परंतु आपल्याला हवी असलेली माहिती सविस्तरपणे, पण अगदी सोप्या शब्दांत सांगणाऱ्या साइट्स अगदी मोजक्याच असतात. अशा साइट्सच्या यादीतील howstuffworks.com/ या साइटचे नाव प्रामुख्याने घ्यायला हवे. या साइटवर विविध विषय आणि त्यांच्या उपविषयांची माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. लेख, विषयाशी संबंधित चित्रे, व्हिडीओ इत्यादी स्वरूपात ही माहिती आपल्याला येथे मिळवता येते.




उदाहरणादाखल, लहानथोरांना मोटारींचे अतिशय आकर्षण असते. या साइटवर ऑटो या विषयाखाली खूप मनोरंजक माहिती उपलब्ध आहे. मोटारींबद्दलच्या मूलभूत ज्ञानापासून त्यांची विविध प्रकारची मॉडेल्स, मोटारींच्या शर्यतींविषयी माहिती, ड्रायव्हिंग आणि सुरक्षितता, विविध प्रकारची इंधने व त्यांची कार्यक्षमता, मोटारींची खरेदी-विक्री यासारख्या विषयांवर उपयुक्त माहिती आणि व्हिडीओज येथे दिसतील. ॲनिमल्स या विषयाखाली निसर्गातली नवलाई उघडून दाखवलेली आहे. पाळीव प्राणी या विभागात विविध प्रकारच्या पाळीव प्राण्यांचे संगोपन, ते प्राणी एकमेकांशी कसा संवाद साधतात, त्यांना बरोबर घेऊन प्रवास करताना घ्यायची काळजी यांसारखी माहिती मिळेल. वन्यप्राणी आणि पक्षी यांच्याबद्दल तसेच जे प्राणी काळाच्या ओघात नष्ट झाले आहेत किंवा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत त्याविषयी वाचायला मिळेल. त्याचबरोबर घोडा आणि झेब्रा हे दोन्ही प्राणी एकाच कुळातील असूनही आपण घोड्यावरून प्रवास करू शकतो; परंतु झेब्र्यावरून नाही, असे का? यासारख्या गमतीदार विषयांवरील माहिती देणाऱ्या व्हिडीओ क्लिप्स उपलब्ध आहेत. विज्ञान या विषयाखाली पर्यावरण, अवकाश, मिलिटरी, भौतिक विज्ञान आणि त्यांच्यातील नवनवीन शोधांची माहिती यासारखे नेहमीचे विषय आहेतच. याशिवाय विज्ञान आणि श्रद्धा-अंधश्रद्धा यावर एक उपविभाग आहे. थोर शास्त्रज्ञ आइनस्टाइनच्या मृत्यूनंतर त्यांच्या मेंदूचे वैद्यकीय विश्लेषण केले गेले. आइनस्टाइनचा मेंदू कसा कार्य करत असे या लेखात या संदर्भातील माहिती वाचायला मिळेल. अशा विविध माहितींचा खजिना या साइटवर लोकांना खुला करून दिलेला आहे. या खजिन्यात सतत नव्याने भर पडतेच आहे. या साइटवर बुद्धीला चालना देणाऱ्या बहुपर्यायी प्रश्नमंजूषा आहेत आणि या प्रश्नमंजूषा लेखांप्रमाणेच माहितीपूर्ण आहेत. तुम्ही योग्य अथवा अयोग्य पर्याय जरी निवडलात तरी तुम्हाला योग्य उत्तरासहित त्याचे स्पष्टीकरण वाचायला मिळते. सुरुवातीला विज्ञान तंत्रज्ञान विषयाला वाहिलेल्या या साइटवर आता जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी माहिती उपलब्ध आहे. ती वाचकांना आवडेल याची खात्री वाटते.

## आता लाइक्स विसरा!

जगातील सर्वात मोठी सोशल साइट फेसबुक लवकरच सर्वांच्या आवडीचे एक खास फिचर बंद करणार आहे. हे फिचर आहे लाइक्सचे. फेसबुकने लवकरच हे फिचर बंद करणार असल्याची घोषणा केली आहे. आपण एखादा फोटो अथवा पोस्ट फेसबुकवर टाकल्यावर आपल्या फ्रेंड लिस्टमधील हजारो मित्र ती पोस्ट लाइक करतात. मात्र आता फेसबुक हे फिचर बंद करणार आहे. तुमच्या फोटो, व्हिडीओ अथवा पोस्टला किती लाइक्स आल्या आहेत, कोणी लाइक्स केले आहे हे तुमच्या मित्रांना व अन्य युजर्सला दिसणार नाही. युजर्स तुमची पोस्ट लाइक करू शकतील. मात्र फेसबुक लाइक काउंट हाइड म्हणजेच लपवणार आहे. हे फिचर्स कधी सुरू करण्यात येईल याबाबत अद्याप माहिती मिळालेली नाही. लाइकमुळे युजर्सची पोस्टमधील रूची कमी होते. त्यामुळे युजर्संनी पोस्टच्या विषयावर अधिक लक्ष देण्यासाठी हे करण्यात येत आहे. याआधी फेसबुकची मालकी हक्क असलेल्या इंस्टाग्रामवर देखील याआधी फोटो आणि व्हिडीओवरील लाइक्स आणि व्ह्यूज युजर्सला दिसणे बंद करण्याचा प्रयोग सहा देशांमध्ये केला जात आहे.

## युट्यूबवर भारतीय पोस्ट करतात सर्वाधिक बनावट व्हिडीओ!




युट्यूब या व्हिडीओ प्लॅटफॉर्मवर खोटे आणि अयोग्य माहिती असणारे व्हिडीओ टाकण्याच्या यादीत भारत सलग दुसऱ्यांदा प्रथम स्थानावर आहे. युट्यूबच्या व्हिडीओ कंटेटच्या नियमांचे उल्लंघन करण्याच्या यादीत भारत, अमेरिका, ब्रिटेन, रशिया आणि ब्राझील सर्वात पुढे आहे. याआधी जानेवारी-मार्च २०१९ मध्ये देखील भारत पहिल्या क्रमांकावर होता. ही नको असलेली कामगिरी भारतासाठी चिंतेचा विषय आहे. युट्यूब कम्युनिटी गाइडलाइन्स रिपोर्टनुसार, एप्रिल ते जून दरम्यान जगभरातून १.०८ करोड व्हिडीओ या प्लॅटफॉर्मवर टाकण्यात आले. यात सर्वाधिक बनावटी व खोटे व्हिडीओ भारतातून पोस्ट करण्यात आले आहेत. यानंतर अमेरिका, ब्राझील, इंडोनेशिया, मॅक्सिको आणि ब्रिटेनचा क्रमांक आहे. युट्यूबने म्हटले आहे की, द्वेष पसरवणारे तब्बल १ लाख व्हिडीओ हटवण्यात आले आहेत. तर हे व्हिडीओ टाकणारे १७ हजारांपेक्षा अधिक चॅनेल बंद करण्यात आले, तर ५० करोडपेक्षा अधिक कमेंट्सदेखील युट्यूबवरून काढून टाकण्यात आल्या आहेत. युट्यूबमधील एका स्वयंचलित सिस्टिमद्वारे व्हिडीओ हिंसा, द्वेष, खोटे, संदिग्ध आदी भागात विभागले जातात. या सिस्टमद्वारे युट्यूबवर येणाऱ्या अयोग्य कंटेटवर नियंत्रण ठेवता येते.

## तुम्हीच व्हा परफेक्ट व्हिडीओ एडिटर!



**स्मार्टफोनवरील कॅमेऱ्याच्या वाढत्या क्षमतेमुळे प्रत्येक घडामोडीचे चित्रीकरण करण्याकडे कल वाढत चालला आहे. विविध घटनांचे कॅमेऱ्यात व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात येते. हॅण्डीकॅम किंवा डिजिटल कॅमेऱ्याने स्वत:च चित्रीकरण करणारेही अनेक आहेत. पण केवळ व्हिडीओ रेकॉर्ड करून तो क्षण कॅमेऱ्यात बंदिस्त करता येत नाही. त्या आठवणी अधिक खुलवण्यासाठी व्हिडीओ एडिटिंग करावेच लागते. सर्वसामान्य वापरकर्ते आपल्याला जमेल त्या पद्धतीने व्हिडीओ एडिटिंग करतात किंवा बाजारात कोणत्याही फोटोग्राफरकडे जाऊन व्हिडीओ एडिटिंग केले जाते. मात्र, पहिल्या पद्धतीत व्हिडीओचे संपादन चुकण्याची भीती असते तर दुसऱ्यात पैसे मोजावे लागतात. अशा वेळी संगणकावर उपलब्ध असलेले मोफत पण उपयुक्त व्हिडीओ एडिटर सॉफ्टवेअर एक चांगला पर्याय ठरू शकतात. अशाच काही महत्त्वाच्या व्हिडीओ एडिटर सॉफ्टवेअरविषयी....**

- विंडोज मूव्ही मेकर : कोणत्याही संगणकासोबत मोफत इन्स्टॉल होऊनच उपलब्ध असलेला विंडोज मुव्ही मेकर हे अतिशय उपयुक्त ॲप्लिकेशन आहे. संगणकावरील व्हिडीओ क्लिप्स केवळ क्लिक आणि ड्रॅग करून एडिटिंग करता येते. एका वेळी अनेक व्हिडीओ क्लिक आणि ड्रॅग केल्यानंतर ते निवडलेल्या क्रमाने दर्शवले जातात. त्यानंतर या व्हिडीओला साउंडट्रॅक जोडणे, कॅप्शन नोंदवणे, व्हिडीओची श्रेयनामावली तयार करणे अशा गोष्टी करता येतात. याशिवाय व्हिडीओ क्रॉप करणे, त्यातील रंगसदृशता कमी-अधिक करणे अशा नेहमीच्या सुविधाही विंडोज मूव्ही मेकरमध्ये उपलब्ध आहेत. हे व्हिडीओ सेव्ह करून थेट यू ट्यूबवर अपलोडही करता येतात.



- केट्स व्हिडीओ टूलकिट : रेकॉर्ड केलेल्या व्हिडीओचे एडिटिंग करणे अतिशय कौशल्याचे काम असते. मात्र, व्हिडीओची लांबी कमी करणे, ठराविक दृश्य कापणे, त्यातील रंगात कमी- अधिक करणे अशा गोष्टी आपल्याला सहज शक्य असतात. कॅट्स व्हिडीओ टूलकिटमध्ये या सर्व गोष्टी उपलब्ध आहेत. तुम्ही एका व्हिडीओचे दोन व्हिडीओ करू शकता किंवा दोन व्हिडीओ एकमेकांना जोडूही शकता. याशिवाय साउंडट्रॅक जोडणे, कॅप्शन नोंदवणे, श्रेयनामावली तयार करणे अशा गोष्टींसाठी या ॲप्लिकेशनमध्ये सुविधा उपलब्ध आहे.
- वी व्हिडीओ : अलीकडे अनेक ॲप्स किंवा सॉफ्टवेअर संगणकावर इन्स्टॉल न करता क्लाउड तंत्रज्ञानाच्या आधारे सर्व्हरवर साठवून तेथून हव्या त्या उपकरणावर वापरण्याची सोय उपलब्ध झाली आहे. संगणकावरील हार्डडिस्कची जागा व्यापली जाऊ नये म्हणून अनेक जण आपले सॉफ्टवेअर क्लाउडवर इन्स्टॉल करतात. त्यामुळे जागा वाचतेच. शिवाय हवी तेव्हा हव्या त्या संगणकावरून संबंधित सॉफ्टवेअर वापरता येते. अशाच सॉफ्टवेअरमध्ये वी व्हिडीओचे नाव घेता येईल. फेसबुक, ट्विटर, यू ट्यूबसारख्या समाजमाध्यम संकेतस्थळांवर व्हिडीओ शेअर करण्यासाठी हे सॉफ्टवेअर अतिशय उपयुक्त आहे. या ॲप्लिकेशनसोबत पाच जीबीची क्लाउड स्पेसही मिळते. यावर व्हिडीओ एडिटिंगसाठी स्पेशल इफेक्टही पुरवण्यात आले आहेत.
- एव्हिडमक्स : व्हिडीओ जोडणे, तोडणे, लोगो टाकणे, क्रॉप करणे, व्हिडीओ रोटेट करणे, रंगछटा बदलणे अशी अनेक कामे करणारा एव्हिडमक्स हा छोटा पण उपयुक्त व्हिडीओ एडिटर आहे. यामध्ये व्हिडीओ एडिटिंगच्या सामान्य सुविधा उपलब्ध आहेतच; पण स्पेशल इफेक्टचे पर्यायही येथे उपलब्ध आहेत.
- व्हीएसडीसी फ्री व्हिडीओ एडिटर : अवघ्या ३२७ केबी आकाराचा हा व्हिडीओ एडिटर छोटा असला तरी त्याची कार्यक्षमता दांडगी आहे. या सॉफ्टवेअरमध्ये एकाच वेळी अनेक व्हिडीओ ओपन करता येतात. कट, कॉपी, पेस्ट, क्रॉप, ट्रिम अशा नेहमीच्या पर्यायासोबतच साउंडट्रॅक जोडणे, कॅप्शन टाकणे अशा अनेक गोष्टी या एडिटरच्या मदतीने करता येतात. मात्र, या व्हिडीओ एडिटरवर फक्त एव्हीआय फाइल्सच एडिट करता येतात.

## शॉर्ट न्यूज

### कोतूळ पोलीस चौकीसाठी उपोषणाचा इशारा

■ **अकोले :** तालुक्यातील सर्वात जास्त गावे समाविष्ट असलेल्या कोतूळ येथील पोलीस चौकीसाठी येथील सामाजिक कार्यकर्ते मच्छिंद्र देशमुख यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयासमोर प्रजासत्ताक दिनी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्याचे निवेदन दिले आहे. याबाबतचे निवेदन नाशिक विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक, अहमदनगर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी संगमनेर, अकोले पोलीस निरीक्षक यांना दिले आहे.

### पुणतांबा जंक्शन रेल्वे स्टेशन शोभेची वास्तू

■ **पुणतांबा :** पुणतांबा शिर्डी रेल्वे मार्ग होताना पुणतांबेकरांनी जी विकासाची स्वप्ने पाहिली होती ती आता भग्न अवस्थेकडे जाताना दिसत आहे पुणतांबा जंक्शन रेल्वे स्टेशन शोभेची वास्तू बनली असून शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळालाच नाही. त्यामुळे गावच्या विकासालाच खिळ बसली. पुणतांबा शिर्डी रेल्वेमुळे पुणतांबेकराचा भ्रमनिरास झाला. पूर्वी पुणतांबा रेल्वेस्टेशनवर चार सवारी गाड्या एक महाराष्ट्र एक्सप्रेसला थांबा होता. सध्या सेंट्रल रेल्वेची एकही रेल्वे गाडी पुणतांबा रेल्वेस्टेशनला थांबत नाही.

### मोबाईल चोरणारा सराईत चोरटा ताब्यात

■ **नगर :** मोबाईल चोरणाऱ्या सराईत चोरट्यास नागरिकांनी पकडून कोतवाली पोलिसांच्या ताब्यात दिले. सचिन सुभाष दाते असे त्याचे नाव आहे. त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्याकडून एक दुचाकी व चार मोबाईल असा ३१ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. संतोष जानराव शिंदे यांनी फिर्याद दिली आहे. ते रविवारी रात्री झोपलेले असताना सोमवारी पहाटे कुत्रे भुंकल्याचा आवाज आल्याने उठले असता त्यांना त्यांचा मोबाईल मिळून आला नाही.

### श्रीरामपूर बाजार समितीला ७१ नफा

■ **श्रीरामपूर :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी १२ कोटी २४ लाख ५१ हजार ६८१ चा मुळ अर्थसंकल्प पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर केला आहे. संस्थेला डिसेंबर २०२३ अखेर २ कोटी ४३ लाख ७२ हजार ६६० रुपयांचे उत्पन्न मिळाले. ७१ लाख ७० हजार ५८२ रुपयांचा नफा झाला आहे, अशी माहिती सभापती सुधीर नवले व प्रभारी सचिव साहेबराव वाबळे यांनी दिली. हा आजवरचा संस्थेच्या इतिहासातील विक्रमी नफा असल्याचेही त्यांनी सांगितले.

### अयोध्या रेल्वे सेवा सुरु करा

■ **नेवासा :** शिर्डी ते श्रीक्षेत्र अयोध्या रेल्वे सेवा सुरु करा अशी मागणी नेवासा तालुका विश्व हिंदू परिषदेच्यावतीने राज्याचे महसूलमंत्री व जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे. श्रीराम भक्तांकरीता साईनगरी शिर्डीच्या रेल्वेस्थानकाकडून पुण्यभूमी अयोध्या येथे रेल्वे सुरू करण्याकरिता आपण पालकमंत्री या नात्याने केंद्रीय रेल्वे मंत्री यांना आपल्या स्तरावरून प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा अशी विनंती मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# सिताबाई थिटे फार्मसी महाविद्यालयाला राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार

## उल्लेखनीय शैक्षणिक कार्याचा गौरव



**शिरुर : प्रतिनिधी**

**श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली.), शिरूर या महाविद्यालयास स्पर्श सेवाभावी संस्था अहमदनगर यांच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शाळा पुरस्कार२०२४ देण्यात आला.सदर पुरस्कार हा महाविद्यालयाने ग्रामीण भागात केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून देण्यात आला.**

१९९५ सालापासून सिताबाई थिटे कॉलेज ऑफ डी. फार्मसी कार्यक्षम फार्मासिस्ट घडविण्याचे कार्य करत असून जवळपास १७०० विद्यार्थी किरकोळ/घाऊक औषध विक्रेते, शासकीय फार्मसीस, औद्योगिक क्षेत्र तसेच परदेशात देखील फार्मासिस्ट म्हणून कार्यरत आहेत.

महाविद्यालयाची २०००० स्क्वेअर फुट स्वतंत्र इमारत असून यामध्ये वर्गखोली,प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष, सेमिनार हॉल इ. सुविधा उपलब्ध असून अनुभवी व तज्ञ शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. महाविद्यालयाचा निकाल नेहमीच ९०% पेक्षा जास्त आहे. २००४ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु जंगम संपदा हिने एम. एस. बी. टी. ई. मुंबई मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये राज्यात द्वितीय क्रमांक पटकाविला होता. महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच विविध उपक्रमातून विद्यार्थ्यांचे संभाषण कौशल्य, नेतृत्व गुण, वेळेचे नियोजन, सर्जनशीलता इ. गुण विकसित होण्यासाठी महाविद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते.

पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दिनांक २० जानेवारी २०२४ रोजी ऑर्किड प्रि-स्कूल क्रीडांगण, नागरदेवळे, भिंगार ता. जि.- अहमदनगर येथे पार पडला.सदर पुरस्कार ज्येष्ठ समाजसेविका सौ. ममताताई सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते देण्यात आला. पुरस्कार स्विकारण्यासाठी महाविद्यालयाच्या वतीने डॉ. द्वारकादास बाहेती , विशाल कारखिले, सौ. हेमांगी झिंजुर्के, सौ. शुभांगिनी केदारी आदी उपस्थित होते. सदर पुरस्कारामुळे महाविद्यालयाची प्रतिमा उंचावली असून आणखी नव्या जोमाने कार्य करण्याची ऊर्जा सर्व शिक्षकांना मिळाली आहे. तसेच सौ. सुप्रियाताई साबळे मंडलिक मॅडम (माजी विद्यार्थिनी डी.फार्मसी.) आणि सर्व विद्यार्थी, हितचिंतक यांनी दाखवलेल्या विश्वासामुळेच महाविद्यालयास आज हा पुरस्कार प्राप्त झाला असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमोल शहा सर यांनी व्यक्त केले.पुरस्कार प्राप्ती बद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र थिटे, सचिव धनंजय थिटे , संचालक डॉ. हर्षवर्धन थिटे तसेच सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# लोकसभा निवडणूक १६ एप्रिलला होणार?

## निवडणूक आयोगाचे पत्र व्हायरल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**लोकसभेच्या निवडणुकीची तारीख ही १६ एप्रिल ठरल्याचे निवडणूक आयोगाचे एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यावर आता केंद्रीय निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिलं आहे. निवडणुकीच्या कामासाठी फक्त संदर्भ म्हणून ही तारीख नोंद केल्याचे आयोगाने सांगितलं. त्यामुळे १६ एप्रिल रोजी निवडणूक होणार या चर्चांना आता लगाम लागला आहे.**

**सोशल मीडियावर पत्र व्हायरल अन् चर्चा**


निवडणूक आयोगाच्या सीईओच्या कार्यालयातून एक पत्र सोशल मीडियावर समोर आल्यानंतर खळबळ उडाली होती. त्यामध्ये निवडणूक आयोगाने १६ एप्रिल ही निवडणुकीची तारीख म्हणून धरल्याचं सांगण्यात येतेय. ही बातमी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हायरल झाल्यानंतर आता निवडणूक आयोगाला त्यावर स्पष्टीकरणं द्यावं लागलं आहे.

**अधिकाऱ्यांच्या संदर्भासाठी फक्त ती तारीख**

निवडणूक आराखड्याचे नियोजन करण्यासाठी अधिकाऱ्यांच्या संदर्भासाठी ही तारीख वापरल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलंय. तर १६ एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होणार नसल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

**व्हायरल पोस्टमध्ये काय आहे नमूद?**

निवडणूक आयोगाने तात्पुरता मतदानाचा दिवस १६ एप्रिल २०२४ घोषित केला आहे. अधिसूचना दिल्लीच्या सर्व ११ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना जारी करण्यात आली होती.



त्यावर भारतीय निवडणूक आयोगाच्या निवडणूक आराखड्यात दिलेल्या वेळेचे पालन असे शीर्षक आहे. दिल्ली सीईओच्या कार्यालयाने थोड्याच वेळात ट्विटरवर पोस्ट केले आणि ती तारीख केवळ संदर्भासाठी होती.

**मविआमध्ये जागावाटपाचा तिढा**

इंडिया आघाडीच्या राज्यातील लोकसभा जागा वाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. या जागा वाटपामध्ये निर्णय होण्याआधीच शिवसेना ठाकरे गटाने राज्यातील ४८ पैकी २३ जागांवर लढण्याचा प्रस्ताव समोर ठेवला आहे. या जागा लढण्यावर शिवसेना ठाकरे गट ठाम आहे.

**तर हाच ठाकरे गटाचा प्रस्ताव**

राज्यातील काँग्रेस नेत्यांनी एक प्रकारे धुडकावून लावला आहे. तर दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीने समसमान चार पक्षांनी १२-१२ जागा लढवाव्यात असा फॉर्म्युला समोर ठेवला आहे. त्यामुळे तिढा सुटण्याऐवजी हा तिढा रोज नेत्यांकडून येणाऱ्या राजकीय प्रतिक्रियांमुळे आणि दाव्यामुळे वाढत असल्याचे दिसतंय.

# प्रभू श्रीरामचंद्र प्राणप्रतिष्ठापना सोहळा पाहणे जीवनाचे भाग्य !

## उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन



**नगर : प्रतिनिधी**

**प्रभू श्रीरामचंद्र प्राणप्रतिष्ठापना सोहळा पाहणे जीवनाचे भाग्य आहे. या सोहळ्यामुळे आपला संपूर्ण देश राममय झाला आहे, असे प्रतिपादन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले. अयोध्या येथील राम मंदिरात झालेल्या प्रभू श्रीराम मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यानिमित्त मार्केट यार्ड येथे महावीर चषक परिवाराच्या वतीने हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते, यावेळी ते बोलत होते.**

अयोध्या येथील राम मंदिरात झालेल्या प्रभू श्रीराम मुर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीराम जय राम जय जय रामच्या घोषणांनी मंदिर परिसर दणाणला होता. भक्तीमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी महावीर चषकचे पदाधिकारी, व्यापारी वर्ग व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. तसेच प्रभू श्रीरामाची वेशभूषा केलेल्या लहान बालकांची शोभायात्रा काढून पुष्प फुलांचा वर्षाव करण्यात आला.

यावेळी संजय चोपडा, राजेंद्र गांधी, किशोर पितळे, संजय लुणिया, नवनीत चंगेडिया, दीपक बोथरा, अनिल लुंकड, अशोक मुनोत, प्रमोद डागा, संदेश मुनोत, जवाहर गांधी, धनेश कोठारी, दायमा महाराज, बाळू बोथरा, राजू पटवा, सचिन भंडारी, सागर देसरडा, राजेश गुगळे, किशोर पोखरणा, प्रशांत डागा, अमित गांधी, रुपेश कटारिया, उमेश मंत्री, निखिल गुगळे, प्रवीण शिंगवी, प्रफुल मुथा, अजय गुगळे, अमोल पोखरणा, अभी कोके, वर्धमान मुनोत, मयूर पितळे, विकास सुराणा, विवेक डफळ, आनंद गांधी, प्रीतम पोखरणा, सागर बोरा, पारस शेटिया, प्रीतम गुंदेचा, अतुल शेटिया, जितू पोखरणा, सुयोग लुनिया, रूपेश भंडारी, प्रतीक भंडारी, राजेंद्र गांधी, राजेंद्र ताथेड, आनंद नहाटा, अजय कांबळे आदी उपस्थित होते.

# श्रीराम चरणी नगर जिल्ह्यात तब्बल २१ लाख लाडूंचा विश्वविक्रमी नैवेद्य

## चारशेपेक्षा अधिक गावात डाळ-साखर वाटप

**नगर : प्रतिनिधी**

**२२ जानेवारीला अयोध्येतील श्रीराम मंदिरात भव्यदिव्य असा प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला आहे. या निमित्ताने देशभर दिवाळी सारख्या सणाचे आनंददायी वातावरण होते. या पार्श्वभूमीवर नगर जिल्ह्यातही श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्ताने असणारा उत्साह केवळ मोठाच नव्हे, तर विश्वविक्रमी झाल्याचे दिसून येत आहे. या दिवशी नगर जिल्ह्यात थोडे-नी-थिडके तब्बल २१ लाख लाडू श्रीराम चरणी नैवद्य म्हणून अर्पिले आहेत.**

दरम्यान, भाजपसह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, धार्मिक संघटना, संस्थांतर्फे जिल्ह्यातील राम मंदिर तसेच हनुमान आदी देवी-देवतांची मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. भगव्या पताकां, सडा-रांगोळ्यानी सजली होती. अनेकांनी महाआरती, महाप्रसाद, भजन-कीर्तन यांचे आयोजन तर राम-सीता वेशभूषा, रांगोळी स्पर्धा असे विविध कार्यक्रमांचे ठिकठिकाणी आयोजन केले होते. घराघरात दिवे-पणत्या, आकाश कंदील, रांगोळी, गोडधोड जेवण करून दीपावली सणा



सारखा हा दिन साजरा करण्यात आला. याच अनुषंगाने खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी गेल्या अनेक दिवसांपासून आपल्या मतदारसंघातील गावोगावी २२ जानेवारीला लाडू बनवण्याच्या उद्देशाने साखर-डाळ शिदा वाटप केला होता.

घराघरात या शिद्यातून बनवलेल्या लाडवातून दोन लाडू परिसरातील श्रीराम, हनुमान मंदिरात प्रसाद म्हणून मूर्तिपूढे ठेवण्यात आले होते. या एकूण उपक्रमासाठी साखर शिदा वाटपापासून ते २२ जानेवारीला ठिकठिकाणच्या मंदिरात उत्सव साजरा करत श्रीरामाच्या लाडू नैवेद्य कार्यक्रमासाठी खासदार सुजय विखे यांचे कार्यकर्ते-यंत्रणेने जिल्हाभर काम केले.

जिल्ह्यात विशेषतः खासदार विखे यांच्या नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात आतापर्यंत ४०० पेक्षा अधिक गावांत मोफत साखर-डाळ वाटपाचे कार्यक्रम आयोजित केले होते. प्रत्येक कार्यक्रमाला स्वतः खासदार विखे यांची आवर्जून उपस्थिती राहिली आहे. त्यांनी या कार्यक्रमातून साखर-शिधा वाटपाचा उद्देश सांगताना २२ जानेवारीला न चुकता दिलेल्या शिद्यातून बनवलेले दोन लाडू जवळच्या श्रीराम अथवा हनुमान आदी मंदिरात नैवेद्य स्वरूपात ठेवण्याचे आवर्जून आवाहन केले होते. त्यानुसार नागरिकांनी आपल्या नजीकच्या मंदिरात लाडूचा नैवेद्य अर्पण केला आहे.

(पान १ वरुन)

## पारनेर तालुक्यातील पतसंस्था सक्षम

सर्व कामकाज संगणीकृत असावे, ठेवीच्या प्रमाणात कार्यालय भाडे असावी, एकूण ठेवीच्या प्रमाणात कर्मचारी वेतन असावे, शासन परिपत्रकानुसार ३१/०३ अखेर १००% एनपीए तरतूद करणे आवश्यक राहील, शासन परिपत्रकानुसार ३१/०३ अखेर १०० टक्के थकव्यात तरतूद करणे आवश्यक राहील व तो व्यवहार दुबेरची असेल, सीआरएआर शासनाच्या शासन परिपत्रकानुसार ३१/०३ अखेर प्रमाण ९% पेक्षा जास्त राहील, नियमक मंडळ यांनी वेळोवेळी केलेले बदल संस्थेस मान्य राहील अशी प्रस्तावित दुरुस्त्यांची मागणी केलेल्या आहेत.

## जिल्ह्यातील दोन्ही जागांवर शिवसेना दावा करणार?

राज्य सहसचिव विक्रम राठोड, बाळासाहेब बोराटे, अनिल बोरुडे उपस्थित होते.

यानंतर बोलताना आमदार शिंदे म्हणाले, लोकसभेच्या शिर्डी मतदारसंघात मागील निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाचा उमेदवार उभा होता. त्यामुळे ती जागा आमचीच आहे. याशिवाय दक्षिण लोकसभा मतदार संघाची जागाही आम्ही महाविकास आघाडीकडे मागणार आहोत. नगर दक्षिणेतून लढण्यासाठी आमच्याकडे तीन वजनदार नावे आहेत. महायुती विरोधकांना टेन्शन देणारी ही नावे आहेत. आघाडीतील जागा वाटपानंतर ती नावे जाहीर केली जातील, असेही त्यांनी सांगितले.

पक्षाचे नवे उपनेते साजन पाचपुते हे पक्षात नवे असून, सध्या संघटनेचे कामकाज समजून घेत आहेत. त्यांच्यासह पक्षातील जे आमच्यासोबत आहेत, त्या सर्वांवर आमचा विश्वास आहे. ते सर्वजण सक्षम आहेत व त्यांच्यावर भरवसाही आहे, असेही आमदार शिंदे म्हणाले. मागील दीड वर्षांपासून माझ्यावर संपर्क प्रमुखाची जबाबदारी आहे, पण माझे काहीसे जिल्ह्याकडे दुर्लक्ष झाले, अशी कबुलीही त्यांनी दिली.

विधानसभा निवडणुकीसंबंधी ते म्हणाले, विधानसभा निवडणुकीत नगर शहर व पारनेर या जागा पूर्वीपासून आम्ही लढवत आहोत. आता जिल्ह्यातील अन्य जागांवरही चाचपणी सुरू आहे. यावेळी श्रीरामपूरची जागा लढवण्याचा आग्रह कार्यकर्त्यांनी केला आहे.

## सहकार मंत्र्यांकडून पारनेरच्या अवसायकाला बेकायदा मुदतवाढ

नमुद करण्यात आला आहे. हे पत्र शासनाकडून न्यायालयात सादर करण्यात आले आहे. या पत्रात नमुद करण्यात आले आहे की, पारनेर कारखान्याच्या अवसायकाला सहकार कायद्यातील विशेष सुटीच्या कलमाखाली एक खास बाब म्हणून दहा वर्षांची कार्योत्तर मंजुरी देत आहोत. या पत्रातून अवसायकाने गेल्या दहा वर्षातील केलेला सर्व गैरकारभार कायदेशीर होण्याचा अर्थ निघत आहे. या बेकायदा नियुक्तीच्या आठ वर्षाच्या कालावधीत अवसायकाने कारखान्याच्या मालमत्तांची विक्री व हस्तांतर व्यवहार केले आहेत. एकीकडे कारखाना बचाव समिती व सभासदांची संस्था पुर्नजीवनाची मागणी शासनाकडे प्रलंबित असताना अवसायकाच्या कामकाजाला सहकार मंत्र्यांनी मुदतवाढ दिल्याने कारखाना बचाव समितीने नाराजी व्यक्त केली आहे. ही मुदतवाढ तातडीने मागे घेण्यात यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. मुदतवाढ बेकायदेशीर असल्याने पुढील सुनावणीवेळी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल असे कारखाना बचाव समितीचे रामदास घावटे यांनी सांगितले.

**मुदतवाढ घोटाळा दडपण्यासाठी**

पारनेर सहकारी साखर कारखाना विक्रीत सुमारे ३०० कोटींचा घोटाळा झालेला आहे. राज्य सहकारी बँक, क्रांती शुगर व अवसायक या घोटाळयाचे मुख्य सुत्रधार आहेत. सहकारातील अनेक बडया अधिकाऱ्यांनी केलेला हा मोठा गैरव्यवहार दडपण्यासाठी पारनेरच्या अवसायन कामकाजास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली आहे. या मंजुरीस कारखाना बचाव समितीचा तिव्र विरोध आहे. ॲड. रामदास घावटे

## पुणेकरांना पुन्हा भरली हुडहुडी !

करून बाहेर पडली होती. मध्यवर्ती पुण्याच्या तुलनेत उपनगरात थंडीचा कडाका जास्त जाणवला. जिल्ह्यातही बहुतांश ठिकाणी किमान तापमान बारा अंशापेक्षा कमीच नोंदवले गेले. सकाळी दहा वाजेपर्यंत हवेतील गारठा कायम होता. दुपारी बाराच्या सुमारास आकाश ढगाळ झाले होते.

उत्तरेकडे वाऱ्यांच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात गारठा वाढला आहे. हवामानातील अनुकूल बदलांमुळे पुण्यातील तापमानात लक्षणीय घट नोंदविण्यात आली. पुढील दोन दिवस आकाश निरभ्र आणि गारठा कायम राहिल, असा अंदाज आयएमडीने व्यक्त केला आहे. पुण्यात थंडी सुरू झाल्यापासून नीचांकी तापमान १० अंशापर्यंत चार ते पाच वेळा घसरले होते. पण ''सिंगल डिजिट'' तापमानाची बुधवारी पहिल्यांदाच नोंद झाली.

मुंबईत उपनगरवासींना मंगळवारी सकाळी कुडकुडणाऱ्या थंडीची जाणीव झाली. सांताक्रूझ येथे मंगळवारी सकाळी किमान तापमान यंदाच्या मोसमातील सर्वांत कमी म्हणजे १४.८ अंशांपर्यंत पोहोचले होते. तर कुलाबा येथे किमान तापमानाचा पारा १९.६ अंश सेल्सिअस नोंदला गेला. सांताक्रूझ येथे सोमवारपेक्षा २.३ अंशांनी तर कुलाबा येथे ०.९ अंशांनी किमान तापमान घसरले. सांताक्रूझ येथील तापमान सरासरीपेक्षा २ अंशांनी कमी नोंदले गेले. यापूर्वी जानेवारीमध्ये सांताक्रूझ येथे गेल्या दहा वर्षांमध्ये किमान तापमान ११.४ अंशांपर्यंतही खाली उतरले होते. गेल्या वर्षी जानेवारीत सांताक्रूझ येथे सर्वांत किमान तापमान १३.८ अंश सेल्सिअस होते. तर २०२०मध्ये ते ११.४ अंशांपर्यंत खाली उतरले होते. कुलाबा येथे गेल्या १० वर्षांमध्ये जानेवारीत सर्वांत कमी किमान तापमान १३.६ अंश सेल्सिअस नोंदले गेले आहे. गेल्या वर्षी जानेवारीत कुलाबा येथे १६.२ अंश सेल्सिअस किमान तापमान नोंदले गेले. मंगळवारी मुंबईच्या वनक्षेत्राच्या परिसरातील बोरिवली, कांदिवली, मालाड, पवई, मुलुंड अशा परिसरामध्ये गारठ्याची जाणीव उर्वरीत मुंबईच्या तुलनेत अधिक होती.

मुंबईत कमाल तापमानाचा पाराही मंगळवारी सोमावरपेक्षा कमी नोंदला गेला. सांताक्रूझ येथे ३० तर कुलाबा येथे २८.५ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते. हे तापमान सोमवारपेक्षा अनुक्रमे १.१ आणि २ अंशांनी कमी होते. बुधवारीही किमान तापमान १७ अंशांहून कमी असेल, असा अंदाज आहे. 'सध्या उत्तरेकडून येणारे वारे अधिक शक्तिशाली असल्याने किमान तापमान खाली उतरले', असे प्रादेशिक हवामान विभाग अधिकारी सुनील कांबळे यांनी सांगितले. मात्र हा पारा गुरुवारपासून पुन्हा वर चढू शकतो. शुक्रवारी २६ जानेवारी रोजी किमान तापमान पुन्हा एकदा २० अंशांच्या पुढे जाऊ शकेल, तसेच कमाल तापमानाचा पाराही ३५ अंशांपर्यंत चढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# श्रीराम प्राणप्रतिष्ठापणेनिमित्त हत्तलखिंडीत विविध कार्यक्रम

## महाभिषेक, पालखी सोहळा, महाआरती आणि दीपोत्सव



■ हत्तलखिंडी येथे श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

हत्तलखिंडी : प्रतिनिधी

**आयोध्या येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम प्राण प्रतिष्ठापणा सोहळयानिमित्त तालुक्यातील हत्तलखिंडी येथे हनुमान श्रीराम मंदिरात समस्त ग्रामस्थ, तरूण मित्र मंडळ यांच्या सहभागातून महाभिषेक, पालखी सोहळा, महाआरती तसेच दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.**

रविवार दि.२१ जानेवारी रोजी शिवशंभू प्रतिष्ठान व तरूण मंडळांच्या सहकार्यातून व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून श्रीराम हनुमान मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सोमवारी सकाळी ७ ते ८ दरम्यान पालखी सोहळा पार पडला. त्यात तरूण मंडळे, ग्रामस्थ, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी तसेच महिला वर्गाने उर्स्फुर्त सहभाग नोंदविला. शिवरूद्र पतिष्ठाणच्या वतीने हनुमान चालीसाचे पठण व महाआरती करण्यात आली. जय मल्हार प्रतिष्ठाण, पांढरी वस्तीच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

शिवशंभू प्रतिष्ठाणच्या वतीने गावातील सर्व मंदिरांवर भगव्या ध्वजांची उभारणी करण्या आली. शिवजयंतीच्या औचित्य साधून १९ फेब्रुवारीपर्यंत शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येणार असून त्या निमित्त विविध उपक्रम, स्पर्धांचे आयोजन करण्यात आहे.

गावातील ज्येष्ठ मंडळी, महिला मंडळ, मंदिराचे पुजारी, भजनी मंडळ, हनुमान मित्र मंडळ, शिवशंकर मित्र मंडळ, खंडेश्वर मित्र मंडळ, आजी माजी सरपंच, उपसरपंच, सेवा संस्थेचे चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य, नीलेश लंके प्रतिष्ठाणचे सभासद आदी या उत्सवात सहभागी झाले होते.

### सडा, रांगोळया आणि दिवे

**सायंकाळी गावातील सर्व घरांसमोर सडा रांगोळया घालण्यात आल्या होत्या. दिव्यांसह आकाश कंदील लावण्यात येउन प्रती दिपावली साजरी करण्यात आली. श्रीराम हनुमान मंदिरात शेकडो दिवे लावण्यात येऊन दीपोत्सव साजरा करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या वतीने मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. फटाक्यांची आतिषबाजी करीत श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात पार पडला.**

# ग्रामीण खेळाडूंनी भारतीय क्रिकेटला दिशा दिली - जयंत येलूलकर

## वासुंदे येथे शाश्वत प्रोफेशनल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

वासुंदे : प्रतिनिधी

**भारताच्या ग्रामीण भागामध्ये क्रिकेट खेळाला महत्त्व दिले जात आहे क्रिकेट हा खऱ्या अर्थाने जंटलमन खेळ आहे. इंग्रजांनी हा खेळ भारतात आणला परंतु या खेळाला भारताने जगात ओळख निर्माण करून दिल्याचे सांगत ग्रामीण खेळाडूंनी क्रिकेटला दिशा दिल्याचे मत जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव जयंत येलुलकर यांनी व्यक्त केले.वासुंदे येथे क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.**

श्री.येलुलकर पुढे म्हणाले की, सध्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात क्रिकेट वाढत आहे. क्रिकेटला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. ग्रामीण भागात सीजन बॉल क्रिकेटला आता जास्त महत्त्व द्यायला पाहिजे. वासुंदे सारख्या ग्रामीण भागामध्ये क्रिकेट स्पर्धा होत आहेत शाश्वत क्रिकेट क्लबच्या माध्यमातून उद्योजक किरण झावरे ग्रामीण भागात खेळाडू तयार करण्यासाठी क्रिकेट स्पर्धा भरवत आहे. त्यांना सर्वांनी साथ देणे गरजेचे आहे. आपल्या नगर जिल्ह्याने झहीर खान, अजिंक्य रहाणे सारखे महान क्रिकेटर या देशाला दिले आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंनी भारतीय क्रिकेटला दिशा दिली आहे. आज ग्रामीण भागातील अनेक क्रिकेट खेळाडू इंडियन प्रीमियम लीग सारख्या राष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेमध्ये खेळताना दिसतात असेही ते म्हणाले.

ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक दिवसापासून शाश्वत क्रिकेट क्लब काम करत आहे. पारनेर तालुक्यातील वासुंदे येथे शाश्वत ब्रिगेड टीम आयोजित शाश्वत प्रोफेशनल क्रिकेट चषक २०२४ या भव्य तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार दि.२४ जानेवारी ते रविवार दि.२८ जानेवारी यादरम्यान ही स्पर्धा संपन्न होत आहे बुधवार दि. २४ रोजी सकाळी १० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य जयंत येलुलकर सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. शाश्वत प्रोफेशनल क्रिकेट चषक २०२४ साठी प्रथम बक्षीस उद्योजक विठ्ठल झावरे संग्राम झावरे, द्वितीय बक्षीस किरण झावरे राहुल उंबरकर, तृतीय बक्षीस सुभाष भामरे साधना भामरे, चतुर्थ बक्षीस रवींद्र खरमाळे यांनी दिले आहे.

वासुंदे येथे साठे मैदानावर क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य व अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव जयंत येलुलकर यांच्या समवेत उद्घाटन प्रसंगी सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी, शाश्वत क्रिकेट क्लबचे किरण झावरे, रामदास झावरे सर, भास्कर चेमटे, उद्योजक निखिल डफळ, श्री. गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेचे संचालक स्वप्निल झावरे, उद्योजक अमोल उगले, इंजि. निखिल दाते, मनराही उद्योग समूहाचे मनोज झावरे, अमोल साठे, दशरथ साठे, सुमित औटी, गणेश बर्वे, शुभम गायखे, विनायक झावरे तसेच शाश्वत क्रिकेट क्लबचे खेळाडू वासुंदे येथील ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**ग्रामीण भागामध्ये अनेक गुणवंत खेळाडू आहे परंतु योग्य प्रशिक्षण त्यांना मिळत नाही. यापुढील काळात क्रिकेट खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी काम करणार आहे. वासुंदे टाकळी ढोकेश्वर सारख्या ग्रामीण भागामध्ये पूर्वीपासूनच क्रिकेट स्पर्धा भरवल्या जातात. यापुढील काळात जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा या भागात भरवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. या भागात एक सुसज्ज क्रिकेट मैदान निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.**

**डॉ. भाऊसाहेब खिलारी,**
**अध्यक्ष : सावली प्रतिष्ठान**

# पारनेर परिवार मित्र मंडळाचे कार्य निस्वार्थी!

## अविनाश घुले यांचे प्रतिपादन



नगर : प्रतिनिधी

**पारनेर परिवार मित्र मंडळाचे कार्य निस्वार्थी व समाजोपयोगी असून मित्र परिवाराच्या उत्कर्षासाठी यात कोणतेही राजकारण आणले जात नसल्याचे प्रतिपादन हमाल पंचायतीचे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांनी व्यक्त केले.**

पारनेर परिवार मित्र मंडळाच्या वतीने नगरमध्ये वास्तव्यास असणाऱ्या पारनेरकर सभासदांचा स्नेह मेळावा, तिळगुळ वाटप व महिलांसाठी हळदीकुंकु समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी श्री.घुले बोलत होते.

स्नेह मेळाव्याची सुरुवात हमाल पंचायत भवन येथे सेनापती बापट यांच्या प्रतिमा पुजनाने मान्यवरांच्या हस्ते झाली. ज्येष्ठ सदस्य अप्पासाहेब पानमंद प्रा. बबनराव झावरे, ज्ञानदेव पांडुळे, ज्ञानदेव तिकोणे, सुर्यभान झावरे यांचे हस्ते तिळगुळ वाटप करण्यात आले. महिलांनी तिळगुळ व हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करुन स्नेहभाव वृध्दींगत केला.यामध्ये सौ. जयश्री झावरे, सौ. सुनंदा पायमोडे, सौ. छायाताई कोकाटे, सौ. मिराबाई तिकोणे यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.

दरवर्षी पारनेर परिवारातर्फे, गुणगौरव सोहळा, पारनेर भूषण पुरस्कार, स्नेहमेळावा, वैचारीक देवाण-घेवाण, व्याख्याने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, वधुवर सुचक इत्यादी कार्यक्रम राबविले जातात. सदर कार्यक्रमासाठी ज्ञानदेव पांडुळे, दत्तात्रय ठुबे, दिपक कुसकर, इंजि. अनिल साळुंके, मुख्या. सुरेश थोरात, डॉ. दिलीप मोटे, प्रकाश देशमुख डॉ. शेळके, वसंत देशमुख इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत पारनेर परिवाराचे अध्यक्ष तारकराम झावरे, सचिव, प्रा. किसनराव पायमोडे, सदानंद सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव प्रा. किसनराव पायमोडे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक संपतराव येणारे यांनी मानले.

# आदिवासी परिवर्तन आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी चव्हाण

## प्रदेशाध्यक्ष पवार यांनी दिले नियुक्तीपत्र

पारनेर : प्रतिनिधी

**वाघुंडे माळवाडी येथील किशोर मंत्री चव्हाण यांची पीपल्स रिपब्लिकन पार्टी प्रणित आदिवासी विकास आघाडीच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शरद स.पवार यांनी चव्हाण यांना नियुक्तीपत्र दिले. आमदार नीलेश लंके यांनी चव्हाण यांचा सत्कार केला.**

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार जोगेंद्र कवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पीपल्स रिपब्लिकन पार्टी प्रणित आदिवासी परिवर्तन आघाडी पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रम व आंदोलनात सहभागी होऊन चव्हाण हे आपले कर्तव्य पार पाडतील अशी अपेक्षा प्रदेशाध्यक्ष पवार यांनी नियुक्तीपत्र प्रदान करताना व्यक्त केली.

पीपल्स रिपब्लिकन पार्टी प्रणित आदिवासी परिवर्तन आघाडी पक्षाच्या वाढीसाठी व आंबेडकरी चळवळीस चव्हाण यांनी संलग्न रहावे अशी अपेक्षा व्यक्त करतानाच पवार यांनी चव्हाण यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

चव्हाण यांनी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी हंगे येथे आ. नीलेश लंके यांनी भेट घेतली. आ. लंके यांनी चव्हाण यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. पदाच्या माध्यमातून सामाजिक कार्यात हिरीरीने सहभागी होण्याचे आवाहन यावेळी आ. लंके यांनी केले.



■ पीपल्स रिपब्लिकन पार्टी प्रणित आदीवासी परिवर्तन आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबददल किशोर चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल आ. नीलेश लंके यांनी त्यांचा सत्कार केला.

# वेसदऱ्याच्या स्मशानभूमीचा कायापालट होणार

## आ. नीलेश लंके व ग्रामस्थांचा पुढाकार

वेसदरे : प्रतिनिधी

**वेसदरे येथील स्मशानभूमीच्या सुशोभिकरणासाठी आ. नीलेश लंके यांनी १५ लाख रूपयांचा निधी दिल्यानंतर ग्रामस्थांनी लोकवर्गणी करून त्यात भर टाकली असून लवकरच स्मशानभूमीचा कायापालट होणार आहे. राणीताई लंके यांच्या हस्ते सुशोभिकरणाच्या कामास प्रारंभ करण्यात आला.**

वेसदरे येथील स्मशानभूमीच्या सुशोभिकरणाचा प्रश्न अनेक दिवासंपासून प्रलंबित होता. त्यासाठी ग्रामस्थांनीत आ. नीलेश लंके यांच्याकडे पत्रव्यवहार केल्यानंतर लंके यांनी स्मशानभूमी सुशोभीकरण व कॉंक्रीटीकरणासाठी १५ लाख रूपयांचा भरीव निधी दिली. या निधीपेक्षा अधिक रकमेची आवश्यकता असल्याने ग्रामस्थांनी लोकवर्गणी करून हा निधी उपलब्ध केला. व त्यानंतर राणीताई लंके यांच्याहस्ते या कामाचे भुमिपूजन करण्यात आले.



■ वेसदरे येथील स्मशानभूमीच्या सुशोभीकरणास राणीताई लंके यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.

सुशोभीकरणासाठी लोकवर्गणी देणारांमध्ये मुंबईकर मंडळ, १८ हजार, बाबासाहेब नवले ४५ हजार, रोहिदास ताठे ४० हजार, सुभानी खैरे ३२ हजार, पोपट तिकोणे २५ हजार, हरी तिकोणे २१ हजार, वसंत तिकोणे १० हजार, सत्यवान तिकोणे ७ हजार, प्रभाकर नवले ६ हजार ५००, निवृत्ती तिकोणे ५ हजार ५००, बाबा खैरे ५ हजार १००, सुभाष ताठे, रावसाहेब ताठे, ज्ञानदेव तिकोणे, शिवाजी जाधव, सहादू तिकोणे, हरी रसाळ, संपत जाधव, दत्तात्रय ताठे, सुभाष तिकोणे प्रत्येकी ५ हजार लहू रसाळ ३ हजार यांचा समावेश आहे. लोकवर्गणीस हातभार लावणाऱ्या देणगीदारांचा सेवा निवृत्त प्राचार्य सुभानजी खैरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सुशोभीकरणासाठी २ लाख ५३ हजार ८८० इतकी रक्कम जमा झाली असून त्यातून मैदान सपाटीकरण, स्मशानभुमी शेड दुरूस्ती, दशक्रिया व प्रवचन ओटा, शववाहिनी, शवदाहीनी स्टॅंड ही कामे पुर्ण करण्यात आली.यावेळी मा. सरपंच सुदाम ताठे, उपसरपंच दिपक पाडळकर, किशोर रोकडे, सुभाष तिकोणे, बाबा जोजार, नाना जाधव तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# सेवानिवृत्त लेखापरीक्षक दादासाहेब गांगड यांचे निधन

## सहकाराबरोबर अध्यात्मातही योगदान

भोयरे गांगर्डा : प्रतिनिधी



**पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथील रहिवासी व सध्या नगर येथे वास्तव्यास असलेले जिल्हा सहकारी बँकेचे सेवानिवृत्त लेखापरीक्षक दादासाहेब सखाराम गांगड पाटील यांचे शनिवारी ( दि.१९ ) अल्पशा आजाराने निधन झाले.ते ८० वर्षाचे होते.**

आध्यात्मिक वृत्तीचे असणारे दादासाहेब गांगड यांची ज्ञानेश्वरी ही मुखोद्गत होती. त्यांनी ज्ञानेश्वरी स्वहस्ताक्षरात लिहिली होती. जिल्हा सहकारी बँकेत पारनेर, कान्हुर पठार,नगर या ठिकाणी शाखाधिकारी म्हणून काम केले होते नंतरच्या काळात जिल्हा सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयात बदली झाल्यानंतर लेखा परीक्षक म्हणून चार वर्षे कामकाज पाहिले.

त्यांच्या पाठीमागे पत्नी एक मुलगा ४ मुली, सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्यांच्या निधनाने अध्यात्मिक व सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी हळहळ व्यक्त केली आहे. नगर येथील प्रसिद्ध शेअर ब्रोकर प्रसाद गांगड यांचे ते वडील तर पत्रकार शरद झावरे यांचे सासरे तर भोयरे गांगर्डाचे माजी सरपंच दौलतराव गांगड यांचे ते चुलते होते.

# छत्रपतींचे विचार रुजविण्यासाठी सेवा योजनेची शिबिरे महत्त्वाची

## शिवव्याख्याते प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांचे मत

निघोज : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी श्रमसंस्कार शिबीरे सर्वाधिक महत्वाची असल्याचे प्रतिपादन शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद यांनी व्यक्त केले आहे.**



श्री.मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज या महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर बाभुळवाडे येथे चालू आहे. या शिबिरामध्ये प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांनी छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार युवकांसाठी कसे महत्त्वाचे आहे हे सांगितले. महाराष्ट्राचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांनी आग्र्याच्या सुटकेपासून ते छत्रपती होण्यापर्यंतचा खडतर प्रवास विद्यार्थ्यांना सांगितला. मराठ्यांचा छावा व त्याने विकसित केलेले विविध गड किल्ले तसेच त्यांनी अभ्यास केलेल्या विविध भाषा व लिहिलेला बुधभूषण हा ग्रंथ याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. आजच्या तरुणाईने संभाजी महाराजांचे विचार आपल्या जीवनामध्ये कसे अवलंबिता येतील याविषयीचे मार्गदर्शन केले. छत्रपती संभाजी महाराज व त्यांचे प्रशासन, लढाया त्यांनी केलेले समाजभिमुख कामे यांची ही माहिती प्रा. ज्ञानेश्वर कवाद यांनी दिली.

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोहर एरंडे, प्रा. विक्रम पवार, प्रा. वैशाली फंड, प्रा.अमृता दौंडकर, प्रा. रुकय्या राजे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# अळकुटीत मोफत नेत्र तपासणी शिबिराला मोठा प्रतिसाद

## ■ अयोध्याच्या श्रीराम प्रतिष्ठापना कार्यक्रमाचे निमित्त ■ डॉ.भास्करराव शिरोळे यांची माहिती

अळकुटी : प्रतिनिधी

**अयोध्या येथील श्रीराम प्रतिष्ठापना कार्यक्रम निमित्ताने अळकुटी येथील मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीरास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून तीनशे रुग्णांची मोफत नेत्र तपासणी झाली असून यामध्ये ५१ रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया झाली असल्याची माहिती नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ भास्करराव शिरोळे यांनी दिली आहे.**

अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की अयोध्या येथील श्रीराम प्रतिष्ठापना हा कार्यक्रम म्हणजे देशाच्या दृष्टीने एक सुवर्ण दिन ठरला आहे. देशातील प्रत्येक गावात व शहरात मोठ्या प्रमाणात सामाजिक व धार्मिक कार्य संपन्न झाले आहेत यामध्ये अळकुटी गावांमध्ये मांडवडहाळे, होमहवन, अयोध्या मंदीर थेट प्रक्षेपण, महाआरती, साम्राज्य डी जे लक्ष्मी लाईट भव्य शोभायात्रा, शब्दप्रेमी सचिन महाराज बेंडे यांचे व्याख्यान, हनुमान चालीसा, पाच हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन,तसेच भजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता दिवसभरातील या कार्यक्रमासाठी भावीकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती अळकुटी येथील ग्रामस्थांनी भाविकांचे मोठ्या उत्साहात स्वागत करुण ग्रामस्थांनी या कार्यक्रमाचे अतिशय मोठ्या प्रमाणात नियोजन केले होते.

यावेळी झालेल्या नेत्र तपासणी शिबीरात तीनशे पेक्षा जास्त रुग्ण सहभागी झाले होते. यामध्ये ५१ रुग्णांवर पनवेल येथील आर आर झुनझुनवाला यांच्या सहकार्याने शंकर आय हॉस्पिटल येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून दिवसभराच्या सर्वच धार्मिक व सामाजिक कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ भास्करराव शिरोळे यांनी दिली आहे.

यावेळी नित्यसेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच डॉक्टर स्मिता शिरोळे, प्रसिद्ध ठेकेदार संजय ठुबे, व्यापारी असोसिएशन मुख्य पदाधिकारी सचिनशेठ साखला, उपसरपंच बाळासाहेब धोत्रे, उद्योजक भास्करराव जाधव, माजी उपसरपंच मधुकर जाधव, माजी उपसरपंच शरद घोलप, किसन शिंदे, बाळासाहेब ठुबे, हरी ओम परंडवाल, आनंद शिरोळे, प्रतीक कापसे,निलेश नरड, सुधीर परंडवाल,विक्रांत काजळे, युवराज चत्तर, दीपक क्षीरसागर, वैभव कळंबे, अजिंक्य धोत्रे, स्वप्नील काजळे, निलेश साळवे, प्रथमेश परंडवाल,शंतनू खामकर, रामकृष्ण पिंगळे, प्रवीण भुकन.संपतराव शिरोळे, संपत जाधव,राहूल गाडेकर, सुभाष भोसले, कैलास शिंदे , प्रेमानंद परंडवाल, नवनाथ कवडे, नवनाथ शिरोळे, मोहन माने , अतुल माने, संतोष जाधव, सोपान शिंदे, प्रविण चौधरी, सुदाम शिरोळे, बंटी शिरोळे, भरत खामकर , विशाल घोलप आदी तसेच ग्रामस्थ व विविध संस्थांचे पदाधिकारी व सदस्य तसेच महिला बचत गटाच्या पदाधिकारी व सदस्य, मुंबईकर मंडळ यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम संपन्न केला.



■ अयोध्या येथील श्रीराम प्रतिष्ठापना कार्यक्रम निमित्ताने अळकुटी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यावेळी नित्यसेवा प्रतिष्ठान माध्यमातून नेत्र तपासणी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com